# महाराष्ट्र शासन

# ग्रामीण रुग्णालय सिन्नर, जि.नाशिक

½ कार्यालय :-०२५५५१२९७०७०
½ भ्रमणध्वनी क्र. ८९७५१५१३५५
E-mail: msrhsinnar@gmail.com

पत्ता - ग्रामीण रुग्णालय ,सिन्नर ,
ता. सिन्नर, जि.नाशिक

जा.क्र.ग्रारुसि/आस्था/ दरपत्रक मागणी/७१५ /२०२६ दि. /०७/२०२६

## दरपत्रक मागणी

**विषय :- राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमातंर्गत तात्पुरत्या स्वरुपात भाडे तत्वावर T-Permit वाहनांचे दरपत्रक सादर करण्याबाबत..**

**संदर्भ :- मा.जिल्हा शल्यचिकित्सक जिल्हा रुग्णालय नाशिक यांच्या कडील पत्र जा.क्र. जिरुना/निवैअआरबीएसके वाहन/२३०८५-१०५/२६ दि.०३/०७/२०२६.**

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये सादर करण्यात येते की ग्रामीण रुग्णालय, सिन्नर, जि. नाशिक येथे राष्ट्रीय बालस्वास्थ कार्यक्रम अंतर्गत तात्पुरत्या स्वरुपात भाडे तत्वावर **T-Permit** वाहनाची आवश्यकता आहेत. त्या अनुषंगाने खालील प्रमाणे कार्यालयाद्वारे दिलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहुन तक्त्या प्रमाणे एकुण ५ **T-Permit** वाहनांची ग्रामीण रुग्णालय, सिन्नर येथे आवश्यकता आहे. त्यामुळे दरपत्रके सादर करतांना बंद पाकीटात दिलेल्या दिनांक व वेळेच्या आत ग्रामीण रुग्णालय, सिन्नर, जि. नाशिक येथे दि.२०/०७/२०२६ ते २५/०७/२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत वैद्यकीय अधिक्षक ग्रामीण रुग्णालय, सिन्नर,हुत्तामा चौक ता.सिन्नर जि. नाशिक यांच्या कार्यालयास सादर करावे.

| अ.क्र. | रुग्णालयाचे नाव | वाहनांची संख्या | वाहनाचा प्रकार |
|---|---|---|---|
| ०१ | ग्रामीण रुग्णालय, सिन्नर | ०५ | सदर वाहने हि फक्त आरबीएसके कार्यक्रमासाठी वापरण्यात येणार असून सर्व वाहने हि ४+१ सीट असलेली बंद बॉडी या तत्सम स्वरुपातील Engine Capacity १००० cc वर असणे आवश्यक आहे. सर्व वाहने हि मागील ०७ वर्ष कालावधी पेक्षा जुनी नसावी. तसेच आरबीएसके कार्यक्रमासाठी वापरण्यात येणारे वाहन हे T-Permit नोंदणीकृत व आरटीओ कडील सर्व परवाने आणि वाहनाचा पुर्ण विमा भरलेली आवश्यक आहे. |

राज्य स्तरावरुन निवीदा प्रक्रिया होई पर्यतं तात्पुरत्या स्वरुपात वरील प्रमाणे एकुण ०५ T-Permit वाहनांची आवश्यक्ता आहे.या करीता खालील प्रमाणे अटी व शर्ती देण्यात येत आहे.

Scanned with OKEN Scanner

अटी व शर्ती

१ )दरपत्रके सादर करतांना बंद पाकीटात दिनांक २२/०७/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत वैद्यकिय अधिक्षक ग्रामीण रुग्णालय, हुत्तामा चौक सिन्नर ता. सिन्नर, जि.नाशिक येथे व्यक्तीशा किवां पोस्टा व्दारे सादर करण्यात यावे.

२) वाहन पुरवठा धारकाकडे नोदंणीकृत ट्रॅव्हल्स एजन्सीचा गुमास्ता,पॅन नंबर,टॅन नवंर, GST नवंर इत्यादी दस्तावेज असणे बधंणकारक आहे व दरपत्रक सादर करतांना सदर दस्ताऐवज सोवत जोडणे आवश्यक आहे.

३) शासकिय कार्यालय तसेच आरबीएसके कार्यक्रमांसाठी वाहन सेवा पुरविल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

४) वाहन रुजु करुण घेण्या अगोदर जिल्हा स्तरावरुन वाहने मा.सेवा व्यवस्थापक विभागीय परीवहन विभाग (आरोग्य विभाग) यांचे कडुन तपासुण घेणे आवश्यक राहील व त्याचे फिटनेस प्रमाणपत्र सादर केल्यानंतर वाहने प्रत्यक्षात रुजु करुण घेण्यात येईल.

५) जिल्हा स्तरावरुन निधीच्या उपलब्धतेनुसार वाहनांचे देयके अदा करण्यात येईल.

६) सदरची वाहने उपलब्ध करुन घेतानां शासन निर्णय दि.१२/१२/२०१६ व इतर वेळोवेळी निर्गमीत केलेल्या शासन निर्णयामध्ये दिलेल्या अटी व शर्ती लागु राहतील याची नोदं घ्यावी.

७) मासिक १५०० कि.मी. व ३१२३८/- च्या मर्यादेत सदरची कार्यवाही करण्यात येईल.

८) सर्व वाहने ही ४+१ सिट असलेली, स्विप्ट डिझायर,सुमो,बोलेरो,इंडीगो,एक्सेट इत्यादी या सारख्या तत्सम स्वरुपातातील असणे आवश्यक आहे.

९) RTO कडील सर्व परवाने व वाहनाचा पुर्ण विमा भरलेला असणे आवश्यक आहे.

१०) वाहनाचे इंधन,वगंण,दुरुस्ती व वाहनचालकाचा खर्च (वेतन,भत्ते,प्रवास) सर्व वाहन पुरवठा धारकास अदा करावा लागेल

११) अपघात,किरकोळ अथवा कोणत्याही स्वरुपाची दुरुस्ती व देखभाल करणे,इत्यादी बाबत जबाबदारी वाहन पुरवठा धारकाची राहील.

१२) शाळा व अगंणवाडी तपासणी अथवा मुलांना सदंर्भ सेवा देण्या करीता वाहनाचा वापर करण्यात येईल.

१३) वाहन चालकाचे वय १८ ते ६० वर्ष असावे.तसेच वाहन परवाना व वैद्यकियदृष्टया योग्य असणे आवश्यक आहे.

१४) मुख्यालयात वाहन कमीत-कमी ९ तास सेवेत असणे आवश्यक आहे.

१५) वाहन फिरस्तीवर असतांना बंद पडल्यास व बिगाड झाल्यास पथकाला पर्यायी वाहन उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी वाहन पुरवठाधारकाची राहील.

१६) वाहनाचे देयक हे PFMS ONLINE व्दारे बॅकं खात्यात करण्यात येईल.

१७) वाहन फिरस्तीवर असतानां टोल टॅक्स वाहनधारकाला भरावा लागेल.

१८) शासकिय सुटटीच्या दिवशी सुध्दा आवश्यक्ते नुसार वाहनाचा वापर करण्यात येईल.

१९) वाहनांची संख्या आवश्यक्तेनुसार कमी व जास्त करण्याची किवां संपुर्ण दरपत्रक प्रक्रिया रदद करण्याचे अधिकारी वैद्यकिय अधिक्षक सामान्य रुग्णालय मालेगांव यांनी राखुन ठेवले आहेत.

२०) वाहनांवर नमुन्याप्रमाणे चारही बाजुनी या कार्यालयाच्या सूचनानुसार लोगो चिकटतवणेचा खर्च वाहन पुरवठादाराने करावयाचा आहे.

२१) पुरवठा केलेले वाहन २४ तास वैद्यकिय अधिकारी राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम यांचे अधिपत्याखाली राहील व तपासणी संपल्यावर मुख्यालयात उपलब्ध असणे बंधनकारक राहील.

२२) वाहनाचा वापर ग्रामीण भाग,डोंगराळ व अतिदुर्गम भागात केला जाईल.

२३) वाहन दुरुस्तीसाठी होणारी धाव कामाकाजाच्या धावेत समाविष्ट करण्यात येणार नाही.

२४ ) कोणतेही दिवशी वाहनाची प्रवासी वाहतूक अथवा गैरवापर झाल्याचे निदर्शनास आलेस वाहन तात्काळ निलंबित करण्यात येईल.

२५ ) पुरवठा केलेले वाहन तालुक्याच्या बाहेर नेता येणार नाही.जिल्हा मुख्यालयास न्यावयाचे झाल्यास वैद्यकिय अधिक्षक ग्रामीण रुग्णालय सिन्नर यांची परवानगी घेणे बंधनकारक राहील.

Scanned with OKEN Scanner

२६) पुरवठा केलेले वाहन मुख्यालयाचे ठिकाणी ठेवण्यात यावे व मुख्यालय बदलण्याचे अधिकार जिल्हा शल्य चिकित्सक,जिल्हा रुग्णालय,नाशिक यांचे राहतील.

**वैद्यकीय अधिक्षक वर्ग - १**
**ग्रामीण रुग्णालय, सिन्नर, जि. नाशिक**

Scanned with OKEN Scanner